# <u>कुलाबा-वांद्रे-सिप्झ मार्गिका - मुंबई मेट्रो ३</u>

## भुयारी मेट्रोच्या रुळांचा पहिला संच मुंबईत दाखल

**मुंबई , जून ९ ,२०२०** – मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या रेल्वे रुळांचा पहिला संच मुंबईत दाखल झाला आहे . मे. मितसुई कंपनी लि. ने पाठवलेला हा संच जपानमधील यावाटा येथून ४ आठवड्याच्या कालावधीत सागरी मार्गाने मुंबईत आणण्यात आला. अचूक तापमान नियंत्रण आणि मजबुती ही वैशिष्ठ्ये असलेली ३६१५ मे. टन वजन असलेल्या हेड हार्डन ( एच एच ) प्रकारच्या रुळ यंत्रणेचे आगमन हे मुंबई मेट्रो ३ च्या पूर्णत्वाच्या दृष्टीने महत्वाचा टप्पा आहे . उर्वरित ७१२५ मे. टन वजनाचे रूळ दोन संचांमध्ये यंदा वर्ष अखेरीस मुंबईत दाखल होतील .

" ही रूळ यंत्रणा उच्च प्रतीची आणि अत्यल्प कंपने देणारी हाय एटीन्यूएशन लो व्हायब्रेशन पद्धतीची असून भारतात ही यंत्रणा प्रथमच वापरण्यात येत आहे . मेट्रो धावत असताना कमीत कमी कंपने आणि ध्वनी निर्माण करणे ही देखील या यंत्रणेची खासियत आहे . मुंबईतील प्राचीन वास्तु यांना इजा न पोहोचण्याच्या दृष्टीनेही ही यंत्रणा उपयुक्त आहे , " अशी माहिती या प्रसंगी बोलताना एमएमआरसी चे व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजित सिंह देओल यांनी दिली . ते पुढे म्हणाले , " ही यंत्रणा इतर सामान्य यंत्रणांच्या तुलनेत २० ते २२ व्हीडीबी इतकी कंपन गति कमी करणारी असून सुरक्षिततेच्या दृष्टीने परिपूर्ण आहे . तसंच जलद आणि सुरक्षित प्रवास उपलब्ध करून देणाऱ्या मुंबई मेट्रो ३ च्या बांधकाम पूर्णत्वाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे . "

महाराष्ट्र शासनाने कोविड १९ संबंधी नेमून दिलेल्या नियमावलीनुसार हा रुळांचा संच मुंबई बंदरातून बीकेसी येथील एमएमआरसी च्या यार्डात काही दिवसातच सुरक्षितपणे पोहोचेल.

(समाप्त)

**Parihas Hate**
**+91 98190 91066**
parihas.hate@perceptindia.in

**Avik Nag**
**+91 89615 48164**
avik.nag@perceptindia.in